स्पेशल क.नं.१२/२०१६ मधील नि.१८ खाली आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादी नं. १ यांनी त्याचे विरूध्द झालेला विनाकैफियत आदेश रद्द होवून कैफियत व म्हणणे स्विकारणेसाठी केला आहे.

२. अर्जाची थोडक्यात हकीकत अशी की, वादी व तिच्या मुलांनी या प्रतिवादीविरूध्द गडहिंग्लज पोलीसांकडे तक्रारी दाखल केल्या व त्या दरम्यान वादीनी प्रस्तुतचा दावा दाखल केला होता. त्यानंतर प्रतिवादी यांना पोलीसांनी चौकशीकरिता बोलावून घेवून त्याचेवर दबाव आणून वादी व प्रतिवादी यांचे दरम्यान आपसात केले. दि.२८.११.२००५ रोजीचे संचकारपत्र रद्द करणेचे व वादीने दिलेले ५,६०,०००/- रू. च्या मोबदल्यात प्रतिवादीने त्याचे मालकीचे गट नंबर ५५६ मधील ०० हेक्टर २३ आर इतके क्षेत्र बनश्री पांडूरंग पताडे हिचे नांवे खरेदी देणेचे तसेच वादींनी या प्रतिवादीविरूध्द दाखल केले पोलीस तक्रारी व दावा काढून घेणे असे ठरले होते.

३. सदर आपसात झाले तडजोडी प्रमाणे वादींनी सदरचा दावा काढून घेतो असे सांगितले. परंतु वादीने सदरचा दावा काढून घेतला असेल या समजुतीने प्रतिवादी हा शांत राहिला. वादीने सदरचा दावा काढून घेतला असेल असा गैरसमज झाल्याने प्रतिवादीने वकिलांची भेट घेवून त्यांचे वकीलपत्र दाखल केले नाही. सदरचा वाद हा स्थावर मिळकतीशी निगडीत आहे. त्यामुळे प्रतिवादी नं.१ यांची कैफियत व म्हणणे विचारात घेणे न्यायाचे व निकडीचे आहे. सबब कैफियत व म्हणणे कामामध्ये स्विकारणेत येवून सामिल करणेत यावे अशी विनंती केली आहे.

४. वादी व वादींचे वकीलांचा पुकारा केला असता गैरहजर. सदर कामी वादी यांनी सदर अर्जास म्हणणे दिले नाही.

५. प्रतिवादी यांच्या वकीलांचा युक्तीवाद ऐकला. सदर युक्तीवाद व कथने विचारात घेता मी या अनुमानास येते की, सदर दावा गुणदोषावर चालवणेसाठी प्रतिवादी विरूध्द झालेला विनाकैफियत आदेश प्रतिवादीवर रू.२००/- खर्च बसवून रद्द करणे आवश्यक आहे. त्यामुळे मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

आदेश

१. सदरचा अर्ज प्रतिवादीवर रू.२००/- खर्च बसवून मंजूर करणेत आला.

२. प्रतिवादी नं.१ विरूध्द विनाकफियत केलेला आदेश रद्द करून प्रतिवादी नं.१ यास आपली कैफियत दाखल करण्यास परवानगी देणेत येते.

सही/-

(यामिनी बोरावके)
दिवाणी न्यायाधिश व स्तर,
गडहिंग्लज

दि. १२.१२.२००१७